## 5) संयुक्त शाळा अनुदान-

ह्या लेखाशिर्षांतर्गत प्राथमिक व माध्यमिक शाळातील भौतिक गरजा पूर्ण करणे व शाळेत योग्य ते शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी सन 2022-23 मध्ये संयुक्त शाळा अनुदान शाळांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे. ह्या अनुदानातून शाळेच्या परिसरात मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपयुक्त उपक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने खर्च करण्यात येतात.

| अ.क्र. | पटसंख्या | वितरीत अनुदान प्रती शाळा रक्कम रू | शाळा संख्या | | एकूण वितरीत अनुदान रक्कम रू | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्राथमिक | माध्यमिक | प्राथमिक | माध्यमिक |
| 1 | Jan-30 | 5000 | 299 | 1 | 1495000 | 5000 |
| 2 | 31-100 | 12500 | 836 | 2 | 10450000 | 25000 |
| 3 | 101-250 | 25000 | 635 | 2 | 15875000 | 50000 |
| 4 | 251-1000 | 37500 | 95 | 18 | 3562500 | 675000 |
| 5 | 1000 पेक्षा जास्त | 50000 | 0 | 1 | 0 | 50000 |
| एकूण | | | 1865 | 24 | 31382500 | 805000 |

## 6) समावेशीत शिक्षण उपक्रम -

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-2009 (RTE-2009) ची अंमलात आला आहे. या अधिनियमातील प्रकरण 2 भाग 3 (2) नुसार नमुद असलेल्या अपंग व्यक्ती अधिनियम (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपुर्ण सहभाग) -1995 (PWD Act-1995) अन्वये, प्रकरण 5 मधील कलम 26 (अ) नुसार शासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांनी प्रत्येक दिव्यांग बालकांस, वयाच्या 18 वर्षापर्यत सुयोग्य व संचारमुक्त वातावरणात नियमित विद्यार्थासोबत शिक्षणात समान संधी, देवुन शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे व प्राथमिक शिक्षण पुर्ण करणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने जिल्हयात सर्व शिक्षा अभियान योजने अतंर्गत समावेशित शिक्षण या उपक्रमातुन 6 ते 18 वयोगटातील प्रत्येक मुलाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे व दर्जेदार शिक्षण देणे हा मुख्य हेतु आहे.